॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. २९ :- विद्यापीठाच्या माध्यमातून योग आणि क्रीडा विषयाशी संबंधित सुरू असलेले उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास पुरक ठरत असून यामाध्यमातून उत्तम विद्यार्थी घडत असल्याचे प्रतिपादन जळगाव लोकसभेच्या खासदार स्मिता वाघ यांनी केले.

क्रीडा व युवा कल्याण मंत्रालय (भारत सरकार), जिल्हा प्रशासन जळगाव व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आज शुक्रवार दि. २९ ऑगस्ट रोजी सकाळी ९.०० वाजता आयोजित राष्ट्रीय क्रीडा दिनाचा कार्यक्रमाचे उद्घाटन खासदार स्मिता वाघ यांच्या हस्ते संपन्न झाले त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस टी इंगळे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य ॲड. अमोल पाटील, प्रा. पवित्रा पाटील,जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक, क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील, योगशास्त्र विभागाचे विभागप्रमुख इंजि. राजेश पाटील आदी उपस्थित होते.

खासदार वाघ पुढे म्हणाल्या की, कोणतेही क्षेत्र असो त्यात सातत्य ठेवणें गरजेचे आहे. तणावमुक्त राहणीमाना करीता किमान एका तर खेळाची आवड जोपासावी. विद्यापीठाचा गेल्या काही वर्षापासून क्रीडा क्षेत्रात प्रगतीचा आलेख वाढला असल्याचे देखील त्या यावेळी म्हणाल्या.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा. माहेश्वरी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी जीवनात उच्च शिखर गाठण्यासाठी हॉकी चे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्यासारखे धीर, तीव्र आवड, चिकाटी, सराव, अचूकता, संयम हे पाच गुण आत्मसात करणे आवश्यक आहे. खेळाडू विद्यार्थ्यांना आपल्या आवडीच्या खेळात प्रावीण्य संपादन करून त्यात करीअर करण्याची देखील संधी आहे. यावेळी त्यांनी विद्यापीठाच्या क्रीडा विभागाच्या प्रगतीची माहिती देत सर्वांनी योगा करून निरोगी राहण्याचे आवाहन देखील त्यांनी केले.

या कार्यक्रमात योगशास्त्र विभागाचे प्रमुख इंजि. राजेश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांचाविशेष अनुदान प्राप्त केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. तसेच आंतरराष्ट्रीय योगदिवसाच्या दिवशी योगशास्त्र विभागाच्या पदव्युत्तर वर्गाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल विद्यार्थी नारायण मांडवडे, जयराम चौधरी, अमरीष चौधरी, योगेश पावरा, शुभम रणदिवे,प्रियंका मेहता, सारीका नागरे, संकेत पाटील, शितल सोनार, रमेश महाजन, भाग्यश्री पवार व शितल पांडीया या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. त्यानंतर एम.ए. योगशास्त्रच्या विद्यार्थ्यांनी योगाचे प्रात्यक्षिक करून दाखवले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक यांनी केले. यावेळी राज्य क्रीडा मार्गदर्शक (योगासने) चंचल माळी यांनी उपस्थितांना राष्ट्रीय क्रीडा दिनाची शपथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कक्षाधिकारी प्रवीण चंदनकर तर आभार कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी मानले. उद्घाटन सत्रानंतर योगाभ्यास करण्यात आला.

**बातमी नं. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २८ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव मधील राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग यांनी फिरती विज्ञान प्रयोगशाळा (Mobile Science Exhibition Unit) या उपक्रमाच्या २०२५-२६ या शै.वर्षातील भेटीचा प्रारंभदि. २५ ते २६ ऑगस्ट रोजी चोपडा तालुक्यात झाला.

या दोन दिवसीय उपक्रमातविद्यार्थ्यांना विविध विज्ञान प्रयोग, मॉडेल्स आणि प्रात्यक्षिकांद्वारे विज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला. उत्साही वातावरणात विद्यार्थ्यांनी प्रश्नविचारून शंकांचे निरसन केले आणि विज्ञानाबद्दल अधिक जाणून घेण्याची आवड व्यक्त केली. या भेटीदरम्यान चोपडा येथील १) दादासाहे डॉ. सुरेश जी. पाटील कनिष्ठ महाविद्यालय, २) ऑक्सफर्ड इंग्लिश स्कूल ३) कस्तुरबा माध्यमिक विद्यालय ४) शरदचंद्रिका सुरेश पाटील इन्स्टिट्यूट ऑक्सफर्ड टेक्नॉलॉजी ५) दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय ६) महात्मा गांधी माध्यमिक विद्यालय या सहा संस्थाना भेटी देण्यात आल्या त्यात ९२९विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला.

या शैक्षणिक भेटीच्या आयोजनासाठी डॉ.प्रिती रावटोडे यांनी फिरती विज्ञानशाळेचे समन्वयक डॉ. एस.एस. घोष यांच्याशी संपर्क साधून उपक्रम यशस्वी केला. या फिरती प्रयोगशाळेचे संघ प्रमुख डॉ. अमरदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अक्षय सैंदाणे, ऋषीकेश चौधरी, रोहित भोई, मयूर बंदे व राहूल हजारी यांनी सहभाग घेतला. तसेच विद्यापीठाचे वाहनचालक गोरखनाथ बोरसे यांनीही सहकार्य केले.

.................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २९ ऑगस्ट, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता